## महाडिक महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिर

मोडनिंब : भेंडमध्ये मा.ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत भेंडमध्ये सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरास सुरुवात झाली.


शिबिराचे उद्‌घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब शिंदे होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुभाष गायकवाड व भेंड गावचे सरपंच डॉ.संतोष दळवी यांनी केले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य रणजित शिंदे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, निशिगंधा कोल्हे, जि.प.सदस्य भारत आबा शिंदे, शंभूराजे मोरे , सभापती दादासाहेब साठे , प्रशांत गिड्डे, वैभव मोरे, कैलास तोडकरी, दीपक सुर्वे, कुमार वाघमारे उपस्थित होते. यावर्षी शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास हे उद्दिष्ट समोर ठेऊन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत अनेक कार्यक्रम होणार आहेत.

CamScanner

दिव्य मराठी
सोलापूर, शुक्रवार, २४ जानेवारी २०२०  ७

ठ ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मानल.

# भेंडमध्ये श्रमसंस्कार शिबिर सुरू



प्रतिनिधी | अरण

भेंड (ता. माढा) येथे मंगळवारी मा. ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरास सुरुवात झाली. शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी श्रमदान करून ग्रामविकासाच्या कार्यात उल्लेखनीय कार्य करावे, असे मत कांबळे यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब शिंदे होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुभाष गायकवाड, सरपंच डॉ. संतोष दळवी यांनी केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेतून ग्रामीण भागाचा शाश्वत विकास कसा केला जाऊ शकतो यासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य रणजित शिंदे, निशिगंधा कोल्हे, भारत शिंदे, शंभूराजे मोरे, दादासाहेब साठे, अध्यक्ष प्रशांत गिड्डे, वैभव मोरे, कैलास तोडकरी, दीपक सुर्वे, कुमार वाघमारे, सरपंच दत्ता सुर्वे, डॉ. प्रवीण पाटील, अजित तळेकर, नागनाथ ओहोळ, उपसरपंच छाया दळवी, तुकाराम मते, शंकर बरडे, दिलीप पाटोळे, गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, ग्रामसेवक मोहिते, कृषी अधिकारी चोपडे, ग्रामपरिवर्तक विकास लुबाळ ,सुहास दळवी, वैजिनाथ भोगे, ज्ञानदेव दळवी, युनूस मुलाणी, बाळासाहेब मते, अंकुश सावंत, माऊली जानराव उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायकवाड यांनी केले. प्रवीण गायकवाड, याकुब मुलाणी, बालाजी सावंत यांनी परिश्रम घेतले.

CamScanner

# ऑनलाईन परीक्षा देताना 'नो एक्झाम' दिसले तर घाबरू नका

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा ५ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. वेळापत्रकानुसार होत असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेवेळी ऑनलाईन परीक्षा देताना विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनला 'नो एक्झाम' असे दिसून आले की, अशा परीक्षार्थींनी घाबरून जाऊ नये. त्यांची परीक्षा पुन्हा २५ ऑक्टोबरनंतर घेण्यात येईल. त्यांची सर्व नोंद विद्यापीठाच्या परीक्षा वॉररूममध्ये होत असते. हेल्पलाईन नंबरशी संपर्क साधून विद्यार्थ्यांनी आपल्या शंकेचे निरसन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्रेणिक शहा यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. कोरोना महामारी संकटामुळे विद्यार्थ्यांना घरी राहूनच ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्याची सोय करण्यात आली आहे. काही विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन केंद्राचीदेखील व्यवस्था करण्यात आलेली आहे, असे त्यांनी सांगितले आहे. ऑफलाईन केंद्रावर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी कोरोना संसर्गाबद्दल सर्व उपाययोजना करूनच परीक्षा द्यावी. मनात कोणतीही भीती न बाळगता अभ्यास करून बिनधास्तपणे विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे. परीक्षा संदर्भात काही अडचणी आल्यास विद्यापीठाच्या हेल्पलाईन क्रमांकाशी संपर्क साधून आपल्या शंकेचे निरसन करावे, असेही कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी म्हटले आहे. सोमवारपासूनच फार्मसीच्या सर्व सत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाणार आहे.

CamScanner

# अंतिम वर्षाच्या परीक्षा आजपासून सुरू

## सोलापूर विद्यापीठ : शहर, ग्रामीणमधील एकूण १९ केंद्रांवर होणार ऑफलाईन परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा आज ५ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. या परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने देता येणार आहेत. सोलापूर शहरात ३ तर ग्रामीण भागात १६ केंद्रांवर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देता येणार आहे.

विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची व्यावसायिक आणि पारंपरिक या दोन भागात विभागणी करण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्नानंतर दुसरा प्रश्न ओपन होईल. पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप हे एका शीटनंतर दुसरे शीट ओपन होईल. पहिल्या शीटमधील प्रश्न सोडवल्यानंतर दुसऱ्या शीटमधील प्रश्न सोडवता येईल. सोडवलेला प्रश्न अथवा शीट परत ओपन होणार नाही. दोन्ही प्रकारच्या परीक्षांमध्ये एटीकेटी, बॅकलॉग विद्यार्थ्यांसाठी ३५ प्रश्न व नियमित विद्यार्थ्यांसाठी ५० प्रश्न सोडवायचे आहेत. दोन्ही परीक्षांचा कालावधी १ तास ३० मिनिटे असला तरी तांत्रिक अडचणींची शक्यता लक्षात घेता परीक्षा लिंक पाच तासांसाठी खुली राहणार आहे; मात्र एक पेपरचा कालावधी १ तास ३० मिनिटे इतकाच राहणार आहे. फार्मसीच्या सर्व सत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाणार आहे. वेळापत्रकानुसार फार्मसीच्या सर्व सत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. त्यानुसार फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### यांची परीक्षा २५ ऑक्टोबरनंतर

लोकमत,

ज्या विद्यार्थ्यांचे लॉगिननंतर 'नो एक्झाम' असा संदेश येईल, त्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही २५ ऑक्टोबरनंतर होईल. याबाबत विद्यार्थ्यांनी हेल्पलाईन नंबरशी संपर्क साधून विद्यार्थ्यांनी आपल्या शंकेचे निरसन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्रेणिक शहा यांनी केले आहे.

CamScanner

दि. ७/२/२०२० दै. पुण्यनगरी - पुरवणी पान ३

# मोडनिंब येथे वसतीगृह सुरू करणार - पटवर्धन

**मोडनिंब/ प्रतिनिधी**

मोडनिंब परिसरातील शालेय मुलां-मुलींची सोय व्हावी म्हणून मोडनिंब येथे श्री. उमाबाई साहेब पटवर्धन स्मारक संस्थेच्या अंतर्गत सायन्स कॉलेज व मुलींसाठी वसतीगृह चालू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मिरज संस्थानचे संस्थानिक बाळासाहेब पटवर्धन यांनी मोडनिंब येथे नूतन अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना काढले.

यावेळी त्यांच्या पत्नी उमाजी राजे पटवर्धन, नातू माधवराव राजे पटवर्धन उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, सदर शिक्षण संस्था १९१९ ला स्थापन झाली. मात्र, या संस्थेची प्रगती न झाल्यामुळे ती नावारुपाला न येता तशीच राहिली. त्यामुळे संस्थेचे नूतन अध्यक्ष विठ्ठलराव पाटील, उपाध्यक्ष महादेव गिड्डे, अ‍ॅड. भिमराव पाटील यांच्यासह सर्व विश्वस्त व शिक्षक बांधवांनी या संस्थेच्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण विकास करण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासाठी आम्ही पटवर्धन कुटुंबीय सतत तुमच्या पाठीशी असल्याचे सांगितले. यावेळी जि.प.सदस्य भारत शिंदे. संस्थेचे सर्व विश्वस्त, सभासद, महाडिक महाविद्यालयाचे प्राचार्य दादासाहेब शिंदे, श्री उमा विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. पी. पाटील, सरपंच दत्ता सुर्वे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष कैलास तोंडकरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत समुद्र यांनी केले.

CamScanner

सकाळ TODAY

30 नोव्हेंबर 2020

अवती भवती...

# उमाबाई पटवर्धन स्मारक संस्थेच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनल विजयी

**मोडनिंब :** येथील सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्थेच्या निवडणुकीत व्ही. के. पाटील यांचा परिवर्तन पॅनल विजयी झाले आहे. त्यांनी मनोहर डोंगरे यांच्या सत्ताधारी पॅनलचा पराभव केला. १९१९ साली या संस्थेची स्थापन झाली आहे. संस्थेची यंदाची निवडणूक अतिशय चुरशीने झाली. निवड झालेले पदाधिकारी : व्ही. के. पाटील (अध्यक्ष), एम. टी. गिड्डे (उपाध्यक्ष), ॲड. बी. एस. पाटील (सचिव) तर विश्वस्त म्हणून डॉ. दिलीप कुलकर्णी, निवृत्ती सोपान सुर्वे, निवृत्ती भगवान सुर्वे, आर. बी. पाटील, मच्छिंद्र मोरे, रामदास शेळके यांची निवड झाली.

CamScanner

# उमाबाई संस्था निवडणूक; परिवर्तन पॅनल विजयी

**माढा, दि. २९-** तालुक्यातील जुनी शैक्षणिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीमंत सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवर्तन पॅनल विजयी झाले असून मनोहरभाऊ डोंगरे आणि शिवाजी चंद्रभान पाटील यांच्या पॅनलचा पराभव झाला असून व्ही. के. पाटील, एम. टी. गिड्डे आणि ॲड. बी. एस. पाटील यांच्या परिवर्तन पॅनलचा विजय झाला आहे. **विजयी उमेदवार खालीलप्रमाणे-** व्ही. के. पाटील (अध्यक्ष ), एम. टी. गिड्डे (उपाध्यक्ष), डॉ. बी. एस. पाटील (सचिव) तर विश्वस्त म्हणून डॉ. दिलीप कुलकर्णी, निवृत्ती सोपान सुर्वे, निवृत्ती भगवान सुर्वे, आर. बी. पाटील, मच्छिंद्र तुकाराम मोरे व रामदास संभू शेळके.

दिनांक ३०।१०।२०२०

# राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने रक्तदान शिबिर

**मोडनिंब (प्रतिनिधी)**

माजी कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मा.ह.महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आणि माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मोडनिंब येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरात ८० रक्तदात्यांनी रक्तदान करून पवार साहेबांना वाढदिवसाच्या निमित्ताने या अनोख्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. सध्या सर्वत्र करुणा महामारी मुळे रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने सामाजिक जाण विचारात घेऊन मोडनिंबच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने अनोखी रुग्णसेवा करण्याच्या उद्देशाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करून ते यशस्वी पार पाडले. याकामी हेडगेवार रक्तपेढीचे मुळीक साहेब व त्यांच्या संपूर्ण टीमने अनमोल सहकार्य केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माढा तालुका अध्यक्ष कैलासदादा तोडकरी, सचिव संतोष पाटील व त्यांच्या संपूर्ण टीमने दिवसभर रक्तदात्यांना प्रोत्साहित करून हे रक्तदा यशस्वी पार पाडले.या रक्तदा शिबिरावेळी आयोजित कार्यक्रमा अध्यक्षस्थान मोडनिंब चे मा सरपंच बाबू तात्या सुर्वेनी भुषवि .यावेळी संस्थेचे अध्यक्ष व्हि. पाटील, सचिव अॅड. बी. ए पाटील,उपाध्यक्ष एम.टी. गिड्डे, स विस्वस्त मंडळ, उपस्थित होते.

दै० कुरुसल्य

दि: १४/१२/2020

CamScanner